# <u>कॅशबॅक अटी आणि शर्ती – एअरटेल ॲक्सिस बँक (Axis Bank) क्रेडिट कार्ड</u>

**व्याख्या:** एअरटेल ॲक्सिस बँक (Axis Bank) क्रेडिट कार्डासाठी, पुढील संज्ञांचे, वेगळा काही अर्थ सांगितला नसेल तर, खालील अर्थ असतील:

- कॅशबॅकचा अर्थ असेल कॅशबॅक योजनेअंतर्गत ग्राहकाच्या क्रेडिट कार्ड खात्यामध्ये बक्षीस म्हणून जमा केलेले पैसे.
- पसंतीच्या मर्चंट्समध्ये काही विशिष्ट मर्चंट्सचा समावेश असेल, ज्यांच्यावर कॅशबॅक कमाई 10% असेल. हे व्यापारी बँकेच्या विवेकबुद्धीने बदलले जाऊ शकतील.
- कॅशबॅकवर खालील तक्त्याप्रमाणे प्रक्रिया केली जाईल:

| वरील खर्च | कॅशबॅक |
|---|---|
| एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून एअरटेल मोबाईल, ब्रॉडबँड, वायफाय आणि डीटीएच बिल देयक चुकते करणे* | 25% |
| एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून गॅस, वीज इत्यादींसारखी उपयुक्तता बिल चुकते करणे ** | 10% |
| पसंतीचे मर्चंट्स*** | 10% |
| इतर सर्व मर्चंट्स/ इतर खर्च | 1% |

* दरमहा रु. 300 ची मर्यादा

** दरमहा रु. 300 ची मर्यादा

*** पसंतीच्या मर्चंट्सवर केलेले खर्च कॅशबॅकसाठी पात्र असतील – स्विगी, झोमॅटो आणि बिगबास्केट. सर्व मर्चंट्सवर एकूण कॅशबॅकची मर्यादा दरमहा रु. 500 इतकी आहे. पसंतीचे मर्चंट्स आणि त्यांच्या संबंधित ऑफर्स यामध्ये वेळोवेळी कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय बदल होऊ शकतो.

- कार्डवरील खालील खर्च/व्यवहारांसाठी कॅशबॅक पात्र नसेल,
  - इंधन खर्च
  - ईएमआय व्यवहार
  - खरेदीनंतर ईएमआयएमध्ये रुपांतरित झालेल्या खरेदी
  - वॉलेट लोडिंग व्यवहार
  - दागिन्यांच्या वस्तूंची खरेदी
  - रोख अग्रिम
  - थकित शिल्लक देयक चुकते करणे

- ○ कार्ड शुल्क आणि आणि कार्ड आकार चुकते करणे
- ○ भाडे चुकते करणे

उदाहरणार्थ, जर ग्राहक खालील खर्चांप्रमाणे एका बिलिंग चक्रामध्ये रु. 30,000 खर्च करत असेल i) एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून रिचार्ज: रु. 2,500 ii) एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून उपयुक्तता बिल चुकते करणे: रु. 2,500 iii) स्विगी, झोमॅटो आणि बिगबास्केट: रु. 5,000 iv) इतर खर्च: रु. 20,000.

- ▪ या “इतर खर्चांपैकी”, रु. 10,000 ईएमआय खरेदीवर होते.

- ▪ अशा प्रकारे कॅशबॅकसाठी पात्र असलेला एकूण खर्च असेल फक्त रु. 2,500 + रु. 2,500 + 5,000 + {रु. 20,000 – रु. 10,000 (ईएमआय व्यवहार)} रु. 10,000 = 20,000
- ▪ उदाहरणामधील बिलिंग चक्रासाठी कॅशबॅक पुढीलप्रमाणे मोजला जाईल:

  रु. 2,500 चे 25% = रु. 625 (दरमहा रु. 300 इतकी मर्यादा असल्यामुळे पात्र कॅशबॅक असेल रु. 300)

  रु. 2,500 चे 10% = रु. 250

  रु. 5,000 चे 10% = रु. 500

  रु. 10,000 चे 1% = रु. 100

  अशा प्रकारे उदाहरणातील एकूण कॅशबॅक असेल रु. 300 + रु. 250 + रु. 500 + रु. 100 = रु. 1,150

- 25% आणि 10% श्रेणींचे कॅशबॅक संबंधित मर्टंट्सनी सामायिक केलेल्या मर्चंट आयडींच्या आधारे मोजले जाईल. यापैकी कोणत्याही मर्चंटवरील व्यवहाराने ॲक्सिलरेटेड कॅशबॅक कमावले नाही तर त्यासाठी ॲक्सिस बँकेला जबाबदार धरले जाईल.

- क्रेडिट कार्ड खात्यात प्राप्त झालेले मर्चंट रिफंड/ कॅशबॅक/ चार्ज रिव्हर्सल इत्यादींसारखे बिगर-ग्राहकांनी सुरु केलेले पेमेंट/क्रेडिट हे कार्डवरील थकित रकमेचा भरणा मानले जाणार नाहीत. मात्र, असे क्रेडिट पुढील महिन्याच्या थकित रकमेचा गणना करण्यासाठी विचारात घेतले जातील.

- सध्याच्या बिलिंग चक्रामध्ये केलेल्या खरेदीसाठी कमावलेले कॅशबॅक विवरणपत्र निर्मिती तारखेच्या आधी 3 दिवस पुढील बिलिंग चक्रामध्ये जमा केले जातील, म्हणजे जर विवरणपत्र तारीख 12 मार्च असेल तर फेब्रुवारी महिन्याच्या चक्रामध्ये (13 जानेवारी - 12 फेब्रुवारी) कमावलेले कॅशबॅक 9 मार्च रोजी जमा केले जातील.

| विवरणपत्र कालावधी: महिन्याची 13 वी तारीख ते पुढील महिन्याची 12 वी तारीख | | | |
|---|---|---|---|
| कॅशबॅक क्रेडिट | 10 तारखेला एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून उपयुक्तता बिल चुकते करणे | रु.1000 | डेबिट |
| | 12 जानेवारी या तारखेच्या विवरणपत्रासह जानेवारीच्या चक्रामध्ये कमावलेले कॅशबॅक | रु.100 | |
| | पुढील विवरणपत्राच्या तारखेच्या 3 दिवस आधी म्हणजे 9 फेब्रुवारीला जमा झालेले कॅशबॅक | रु.100 | क्रेडिट |

विवरणपत्राच्या कालावधीमध्ये केलेले खर्च वजा त्याच कालावधीतील कोणतेही रिटर्न्स किंवा रिफंड यांच्या आधारावर कमावलेल्या कॅशबॅकची गणना केली जाईल.

- विवरणपत्र निर्मिती तारखेनंतर खरेदी/ व्यवहार परत करण्यात आला / रद्द करण्यात आला / माघारी घेण्यात आला तर अशा व्यवहारांवरील कॅशबॅक अशी खरेदी / व्यवहार माघारीच्या तारखेला वजा करण्यात येईल.

- नंतरच्या तारखेला व्यवहाराचे ईएमआयमध्ये रुपांतर होण्याच्या बाबतीत, अशा व्यवहारांवर कमावलेले कॅशबॅक

ईएमआय रुपांतरणाच्या बिलिंग चक्रामध्येच माघारी घेतले जाईल.

- बिलिंग चक्रादरम्यान कमावलेले/माघारी घेतलेले कॅशबॅक मासिक क्रेडिट कार्ड बिलिंग विवरणपत्रामध्ये दिसेल.

- जर ग्राहकाने व्यवहार माघारी घेतला, त्या व्यवहारावर कमावलेले संबंधित कॅशबॅक देखील माघारी घेतले जातील आणि जर ग्राहकाची क्रेडिट कार्डावर माघारी घेतलेल्या कॅशबॅकच्या स्वरूपात थकबाकी शिल्लक असेल तर ती सामान्य थकबाकी शिल्लक मानली जाईल आणि ग्राहकावर अशी थकित रक्कम चुकती करण्याचे दायित्व असेल, तसे न केल्यास त्या रकमेवर सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्तींमध्ये परिभाषित केलेल्या शुल्काच्या वेळापत्रकाप्रमाणे शुल्क आणि आकार आकारले जातील.

- कॅशबॅकच्या कमाईवर खालीलप्रमाणे मर्यादा आहेत:

    - एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून एअरटेल मोबाईल, ब्रॉडबँड, वायफाय आणि डीटीएच बिल चुकते करण्याच्या खर्चावरील 25% कॅशबॅकसाठी मर्यादा दरमहा रु.300 इतकी आहे.
    - एअरटेल थँक्स ॲपच्या माध्यमातून गॅस, वीज इत्यादींसारख्या उपयुक्तता बिल चुकते करण्याच्या खर्चावरील 10% कॅशबॅकसाठी मर्यादा दरमहा रु.300 इतकी आहे.
    - पसंतीच्या मर्चंट्सवर 10% कॅशबॅकसाठी मर्यादा दरमहा रु.500 इतकी आहे (सर्व मर्चंट्स एकत्रित करून).
    - इतर खर्चावरील 1% कॅशबॅकसाठी कोणतीही मर्यादा नाही.

- जर कार्डधारकाचे एअरटेल ॲक्सिस बँक (Axis Bank) क्रेडिट कार्ड कोणत्याही कारणासाठी कोणत्याही वेळी समाप्त करण्यात आले, मग ते प्राथमिक कार्डधारकाने केलेले असेल किंवा बँकेने, प्राथमिक कार्डधारक तातडीने कॅशबॅकची कमाई करण्यास अपात्र ठरवला जाईल आणि एअरटेल ॲक्सिस बँक (Axis Bank) क्रेडिट कार्ड स्वेच्छेने किंवा अनिच्छेने रद्द केल्यानंतर त्या वेळेस जमा असलेले आणि न वापरलेले कॅशबॅक आपोआप ताबडतोब जप्त केले जातील.

- कार्डधारकाच्या खात्यात जमा होणे प्रलंबित असलेल्या कॅशबॅकसह कोणतेही उर्वरित कॅशबॅक खालीलपैकी कोणत्याही प्रसंगी तातडीने अवैध ठरवले जातील:
    - एअरटेल ॲक्सिस बँक (Axis Bank) क्रेडिट कार्ड रद्द होणे; किंवा
    - एअरटेल ॲक्सिस बँक (Axis Bank) क्रेडिट कार्डाचे इतर कोणत्याही ॲक्सिस बँक (Axis Bank) क्रेडिट कार्डमध्ये रुपांतर होणे
    - हलगर्जीपणा झाल्यास, म्हणजे जर देयक देय तारखेला किमान देय रक्कम न भरल्यास किंवा
    - कार्ड मेंबर ॲग्रीमेंटच्या कोणत्याही कलमाचा भंग झाल्यास

  आणि कार्ड सदस्याचे सदस्यत्व पूर्ववत झाले तरी, ॲक्सिस बँकेकडून (Axis Bank) कोणताही रिफंड, कालमर्यादेत वाढ किंवा नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

- क्रेडिट कार्ड हे केवळ वैयक्तिक खर्च आणि उद्देशांसाठीच जारी केले जाते. कार्डधारकाने कार्डचा वापर व्यावसायिक किंवा उद्योगासाठी पुनर्विक्री करण्याच्या उद्देशाने काहीही खरेदी करता कामा नये. क्रेडिट कार्ड केवळ कायदेशीर, खऱ्याखुऱ्या वैयक्तिक उद्देशांसाठीच वापरले पाहिजे आणि कोणत्याही मनी लाँडरिंग, समाजविरोधी किंवा सट्टा लावण्यासाठी वापरता कामा नये किंवा उद्योगात व्यावसायिक कारणासाठी त्याचा गैरवापर करता कामा नये (उदा. भांडवली उद्देशासाठी काम करणे).

- जर क्रेडिट कार्ड प्रतिबंधित, निर्बंधित, व्यावसायिक उद्देशांसाठी किंवा उपरोल्लेखित उद्देशांसाठी वापरले जात असल्याचे आढळले तर, ॲक्सिस बँक (Axis Bank) कार्डधारकाला कोणतीही नोटीस न देता आपल्या विवेकबुद्धीने संबंधित क्रेडिट कार्ड आणि त्यासंबंधीचे अतिरिक्त/ॲड-ऑन कार्ड रद्द करण्याचा अधिकार वापरते आणि कमावलेले कॅशबॅक रोखून धरते/रद्द करते. क्रेडिट कार्डचे व्यवहार, वापराच्या पद्धती, इत्यादींबद्दल ॲक्सिस बँक (Axis Bank) फोनवरून किंवा औपचारिक संभाषणाच्या इतर साधनांच्या माध्यमातून चौकशी करू शकते आणि तपशील, माहिती,

पुरावे, इ., मागू शकते. कार्डधारकाकडून असमाधानकारक उत्तरे मिळाल्यास किंवा उत्तरे न मिळाल्यास ॲक्सिस बँकेद्वारा (Axis Bank) कार्ड ब्लॉक/बंद केले जाऊ शकते.

- मर्चंट आस्थापनामध्ये कार्डचा वापर हा बँकेने प्रत्येक कार्ड खात्याला नेमून दिलेल्या क्रेडिट मर्यादेने मर्यादित असेल.

- बँक कोणत्याही वेळी, कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय, किंवा कोणतेही कारण न देता, मर्चंट आस्थापनेच्या ठिकाणी शुल्क अधिकृत करण्यास नकार देऊ शकते, आणि/किंवा कार्ड सदस्याची कार्ड वापरण्याची आणि/किंवा कार्ड निलंबित किंवा रद्द करण्याची क्षमता निर्बंधित करू शकते किंवा पुढे ढकलू शकते. क्रेडिट किंवा व्यवसाय जोखमीच्या योग्य व्यवस्थापनासाठी आवश्यक आहे किंवा जर कार्डाचा अथवा कार्ड खात्याचा गैरवापर होत आहे किंवा होण्याची शक्यता आहे असे बँकेला वाटल्यास ती ते एटीएम, मर्चंट आस्थापना यांच्या माध्यमातून, स्वतःहून ताब्यात घेऊ / राखून ठेवू शकते.

- कॅशबॅक योजना समाप्तीच्या तारखेनंतर ही योजना सुरू ठेवण्यासाठी किंवा कॅशबॅक योजनेऐवजी एखादी नवीन किंवा समान योजना लागू करण्यासाठी, कॅशबॅक प्रस्तावातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ ॲक्सिस बँकेवरील (Axis Bank) किंवा सहभागी मर्चंट भागीदारांवरील बंधनकारक दायित्व असा लावला जाणार नाही.

- बँक कोणत्याही ग्राहकाला कॅशबॅकची कमाई करण्यास किंवा उपक्रमाच्या कोणत्याही वैशिष्ट्याचा वापर करण्यास तात्पुरती मनाई करू शकते.

- ज्या ग्राहकांना त्यांचे ईएमआय (EMI) व्यवहार रद्द करायचे असतील त्यांनी त्यासाठी 18604195555/18605005555 या ॲक्सिस बँकेच्या (Axis Bank) ग्राहक सेवा क्रमांकावर फोन करावा.

- ग्राहक/बँकेने रद्द केलेल्या ईएमआय (EMI) व्यवहारांसाठी, त्या संबंधित चक्रात ग्राहकाच्या विवरणपत्रातील कॅशबॅक दोन वेळा वजा होऊ शकतात, ॲक्सिस बँकेच्या (Axis Bank) ग्राहक सेवेला फोन करून, कॅशबॅक चुकीच्या पद्धतीने वजा करण्यात आले आहे हे तारीख आणि व्यवहाराच्या रकमेसह नमूद करून ग्राहकाने त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी सेवा विनंती उपस्थित करणे आवश्यक आहे.

- ईएमआय (EMI) व्यवहारांवर कोणतेही कॅशबॅक नसल्यामुळे एकदा एका व्यवहाराचे रुपांतर ईएमआयमध्ये (EMI) झाले की, जरी ग्राहकाने ईएमआय (EMI) बंद करण्याचा आणि त्यावर संपूर्ण रक्कम चुकती करण्याचा पर्याय निवडला तरी ग्राहकाला त्या व्यवहारावर कोणत्याही कॅशबॅकची कमाई करता येणार नाही.

- ज्या ग्राहकांना त्यांचे ईएमआय (EMI) व्यवहार बंद करायचे असतील तर त्या ग्राहकांना ॲक्सिस बँक (Axis Bank) ग्राहक सेवेला फोन करावा लागेल आणि त्यासाठी विनंती करावी लागेल.

- प्रत्येक स्वतंत्र व्यवहारासाठी कॅशबॅक रुपयाच्या सर्वात जवळील मूल्याइतका पूर्ण अंक केला जाईल. उदाहरणार्थ, जर रु. 1540 व्यवहारावर ग्राहक 1% कॅशबॅकसाठी पात्र असेल तर, म्हणजे 1540* 1% = रु. 15.4. त्या स्वतंत्र व्यवहारासाठी ग्राहकाच्या खात्यामध्ये फक्त रु. 15 जमा केले जातील.

- खालील एमसीसी (MCCs) कॅशबॅक पात्रतेमधून (इंधन, वॉलेट लोड, दागिने, भाडे चुकते करण्याच्या व्यवहारांसाठी) वगळण्यात आले आहेत: 6012, 6051, 5541, 5983, 5542, 5944, 6011, 6540, 6513.

- दस्तऐवजामध्ये नमूद केलेल्या अटी आणि शर्ती कोणत्याही वेळी 30 दिवसांची पूर्वसूचना देऊन सुधारित किंवा समाप्त केली जाऊ शकते.

- कार्ड मागे घेतले असेल किंवा रद्द केले असेल किंवा रद्द होण्यास पात्र असेल किंवा कार्ड सदस्याचे खाते अपराधी खाते असेल तर कॅशबॅक लागू होणार नाही.

- ॲक्सिस बँकेने (Axis Bank) कॅशबॅकची केलेली गणना कार्डधारकावर अंतिम, निर्णायक आणि बंधनकारक असेल आणि त्यावर वाद उपस्थित करता येणार नाही किंवा प्रश्न विचारता येणार नाही.

- या दस्तऐवजातील अटी आणि शर्ती या सर्वात महत्त्वाच्या अटी आणि शर्ती दस्तऐवजाच्या जोडीला असतील आणि त्यामध्ये शिथिलता किंवा सवलत मिळणार नाही.

- ॲक्सिस बँक (Axis Bank) खुशीने कॅशबॅक प्रस्ताव उपलब्ध करून देते आणि ॲक्सिस बँक (Axis Bank) कोणत्याही वेळी आणि कार्ड सदस्यांना नोटीस देऊन या सर्व किंवा यापैकी कोणत्याही अटी आणि शर्तींमध्ये भर घालण्याचा आणि/किंवा त्यामध्ये फेरफार, दुरुस्ती, बदल किंवा त्या कमीअधिक करण्याचा कॅशबॅक योजनेऐवजी संपूर्णपणे किंवा अंशतः दुसरी योजना आणण्याचा किंवा ती पूर्णतः काढून घेण्याचा आपला हक्क स्पष्टपणे राखून ठेवते.

- अटी आणि शर्तींमधील कोणत्याही मुद्द्याबद्दल पूर्वग्रह न ठेवता, रिवार्ड्स योजनेमधून किंवा त्याच्याशी संबंधित किंवा त्याचा परिणाम म्हणून किंवा या दस्तऐवजांशी एरवी संबंधित उद्भवलेले सर्व वाद, असल्यास, मुंबईतील सक्षम न्यायालये/लवादांच्या अनन्य कार्यक्षेत्राच्या अधीन असतील.